
# कोणा नच द्या इजा

## स्वाध्याय


### अ. आकलन

**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. भवसागर २. पैलतीर

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. अन्यायाच्या मार्गावर जाऊ नका.

२. कोणालाही इजा करू नका.

३. सत्य वचन राखण्यात ढळू नका.

४. झोपलेले (बेसावध) राहू नका.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. तन २. मन

३. धन

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**




**उत्तर:** १. सम-दृष्टीने २. साधन (सत्कृत्य)

**कृ.५. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. 'कोणा नच द्या इजा' हा कवी _______ यांचा फटका आहे. (आनंद फंदी / अनंत फंदी / अनंता छंदी / आदिनाथ फंदी)

२. '_______' या संपादित ग्रंथातून 'कोणा नच द्या इजा' हा फटका घेतला आहे.

(नवनीत (आवृत्ती ११ वी) / नवनीत (आवृत्ती १५ वी) / नवनीत (आवृत्ती १८ वी) / नवनीत (आवृत्ती ८१ वी)

३. _______ होऊनि थोर-लहानां समदृष्टीने पूजा।

(अ-गम्य / अ-मूल्य / अ-कपट / अनिवार्य)

४. येणे _______ तरुनि सुखे व्हावे पैल-तिरा।।

(जन-सागर / भव-सागर / भक्ति-सागर / दया-सागर)

**उत्तर:** १. अनंत फंदी

२. नवनीत (आवृत्ती १८ वी)

३. अ-कपट ४. भव-सागर

**कृ.६. खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. अनंत फंदींनी सांगितलेली सत्कृत्ये आचरणात आणल्यास, तारण्यासाठी _______

अ. खुद्द परमेश्वर हात देईल.

ब. नियतीच हात देईल.

क. कुणाच्याही मदतीची गरज उरणार नाही.

ड. खुद्द अनंत फंदी हात देतील.

२. कवी अनंत फंदी हितगुज कथितात, की ______

अ. माणसाने खोटे बोलण्यास कचरू नये.

ब. माणसाने असत्याची कास धरू नये.

क. माणसाने सत्य वचन राखण्यास ढळू नये.

ड. माणसाने नेहमी सत्य बोलावे.

**उत्तर:** १. अनंत फंदींनी सांगितलेली सत्कृत्ये आचरणात आणल्यास, तारण्यासाठी **खुद्द परमेश्वर हात देईल.**

२. कवी अनंत फंदी हितगुज कथितात, की **माणसाने सत्य वचन राखण्यास ढळू नये.**

**कृ.७. सत्य विधान शोधून लिहा.**

मनुष्य जन्माला येऊन माणसाने असे वागावे –

अ. अन्यायाच्या मार्गावरूनच चालावे.

ब. कोणालाही वाईट वाटेल असेच वागावे.

क. संकट समयी पळून जावे.

ड. सत्य वचन सांगण्यास घाबरू नये.

**उत्तर:** सत्य वचन सांगण्यास घाबरू नये.

**कृ.८. असत्य विधान शोधून लिहा.**

मानवदेहामध्ये जन्माला आल्यानंतर माणसाने असे वागू नये –

अ. दुसऱ्याला इजा करणे.

ब. सर्वांना समान दृष्टीने वागवणे.

क. असत्य वचन बोलणे.

ड. संकटसमयी खचून जाणे.

**उत्तर:** सर्वांना समान दृष्टीने वागवणे.

**कृ.९. कवितेवर आधारित प्रश्न**

**१. 'नर-देहामधि येऊन नर हो साधन ऐसे करा।**
**येणे भव-सागर तरुनि सुखे व्हावे पैल-तिरा।।'**
**या काव्यपंक्तीचे विचारसौंदर्य स्पष्ट करा.**

**उत्तर:** कवी अनंत फंदी यांच्या 'कोणा नच द्या इजा' या काव्यरचनेच्या या ओळी आहेत. माणसाने व्यावहारिक जीवनात कसे जगावे याबाबतचा उपदेश कवीने केला आहे. कवी म्हणतात, मानवाचा जन्म घेतला आहे, तेव्हा त्याचे सार्थक करण्यासाठी असे कार्य करा, की ज्यायोगे संसाररूपी भवसागरातून तुम्ही सहज तरून पैलतीरावर जाल. म्हणजेच जगताना असे काम करा, की ज्यायोगे परमार्थ साधला जाईल व मोक्ष मिळेल.

**२. 'सत्य वचन राखण्यास न ढळा**
**कथितो ह्या हित-गुजा।**
**व्हा सावध नच निजा। गड्यांनो।।' या पंक्तीतून कवी कोणता उपदेश देत आहे?**

**उत्तर:** 'कोणा नच द्या इजा' या अनंत फंदी यांच्या काव्यरचनेतील या पंक्ती आहेत. मानवदेही जन्म घेतल्यावर माणसाने कसे जगावे, याविषयी कवीने उपदेश केला आहे. कवी म्हणतात, सत्याची कास धरा. सत्यवचन पाळताना कितीही अडचणी आल्या, तरी माघार घेऊ नका, हे मनातले हितगुज मी तुमच्याशी करत आहे. सदैव सावध राहा, म्हणजेच बेसावध राहू नका, असा उपदेश कवीने केला आहे.

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. हित : भले : : [ ] : माणूस

२. [ ] : अपकीर्ती : : लहान : थोर

**उत्तर:** १. नर     २. सत्कीर्ती

**कृ.२. खालील शब्दांना कवितेत वापरलेले पर्यायी शब्द लिहा.**

| शरीर | अपाय | किनारा | सिंधू | निष्कपट |
|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ | ५ |

| कृत्य | मार्ग | ख्याती | आपत्ती |
|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| ६ | ७ | ८ | ९ |

**उत्तर:**

१. देह     २. इजा

३. तीर     ४. सागर

५. अ-कपट     ६. साधन

७. पथ     ८. कीर्ती

९. संकट

कृ.३. कवितेत वापरलेले शब्द व त्यातून सूचित होणारे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.

| | शब्द | | अर्थ |
|---|---|---|---|
| १. | नर-देह | अ. | मोक्ष |
| २. | भव-सागर | ब. | अन्यायाचा मार्ग |
| ३. | पैल-तीर | क. | समानतेची दृष्टी |
| ४. | अ-कपट | ड. | सर्वस्व खर्च करणे |
| ५. | थोर-लहान | इ. | निष्कपट |
| ६. | सम-दृष्टी | ई. | लहानांपासून मोठ्यांपर्यंत |
| ७. | अन्याय-पथ | फ. | मानवाचे शरीर |
| ८. | तन-मन-धन | ग. | संसाररूपी सागर |

**उत्तर:** (१ - फ), (२ - ग), (३ - अ), (४ - इ), (५ - ई), (६ - क), (७ - ब), (८ - ड)

**कृ.४. खाली दिलेल्या शब्दांपासून तीन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | हित : | | | |
| २. | देह : | | | |

**उत्तर:** १. हितचिंतक, हितकारक, हितगुज

२. देहदान, देहयोग, देहान्त

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्दांचे कवितेतील सामान्यरूप लिहा.**

१. देह २. दृष्टी

३. गडी ४. दु:खित

**उत्तर:** १. देहा २. दृष्टी

३. गड्यां ४. दु:खिता

**कृ.२. वाक्यातील अधोरेखित अव्ययाचा प्रकार लिहा.**

'नरदेहामधि येऊन नर हो साधन ऐसे करा'

**उत्तर:** नरदेहामधि – शब्दयोगी अव्यय

**कृ.३. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. नरदेह २. भवसागर

३. समदृष्टी ४. सत्कीर्ती

५. सद्विचार

**उत्तर:**

| | **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समास** |
|---|---|---|---|
| १. | नरदेह | नर (मनुष्य) रूपी देह | कर्मधारय समास |
| २. | भवसागर | भव हाच सागर (संसार) | कर्मधारय समास |
| ३. | समदृष्टी | समान अशी दृष्टी | कर्मधारय समास |
| ४. | सत्कीर्ती | सत् (चांगली) अशी कीर्ती | कर्मधारय समास |
| ५. | सद्‌विचार | सत् (चांगले) असे विचार | कर्मधारय समास |

**कृ.४ या कवितेचा काव्यप्रकार ओळखा.**

ओवी / भारूड / फटका / अभंग

**उत्तर:** फटका

**कृ.५. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. आश्चय   २. सक्तीर्ती

३. दु:खीत   ४. द्रुष्टि

**उत्तर:** १. आश्रय   २. सत्कीर्ती

३. दु:खित   ४. दृष्टी

## ड. माझे मत

**कृ.१. कवी अनंत फंदी यांनी प्रस्तुत काव्यरचनेच्या आधारे कोणता उपदेश दिला आहे?**

**उत्तर:** 'कोणा नच द्या इजा' या काव्यरचनेच्या आधारे अनंत फंदी यांनी व्यावहारिक जीवनात कसे जगावे याबद्दल उपदेश केला आहे. ते म्हणतात, मानव जन्म मिळाला आहे, तर मानवाने सत्कृत्याच्या आधारे संसाररूपी भवसागरातून तरून परमार्थाचा पैलतीर गाठावा. मानवाने निष्कपट मनाने लहान-थोरांमध्ये भेदाभेद न करता समदृष्टी बाळगावी. अन्यायाच्या मार्गावर चालू नये व अन्याय सहनही करू नये. सद्सद्विवेक बुद्धीने विचार करावा जेणेकरून लोकांच्या मनात त्याच्याविषयी प्रतिष्ठेचे स्थान निर्माण होईल. हे साधताना कोणालाही इजा करू नये, दुखवू नये.

दु:खितांना, वंचितांना आश्रय द्यावा. त्यांच्या सेवेत तन-मन-धन झोकून द्यावे. संकटास धैर्याने तोंड द्यावे, सत्य वचनाचे पालन करावे. त्यात कितीही अडचणी आल्या, तरी माघारी फिरू नये. कायम सावध असावे, बेसावध राहू नये. अशा माणसाला देवही स्वत: दोन्ही हातांनी मदत करतो. अशा प्रकारे, कवीने सन्मार्गावर कसे चालावे, याविषयी मार्गदर्शन केले आहे.

**क्र.२. तुमच्या मते 'आदर्श नागरिक' कसा असावा?**

**उत्तर:** आदर्श नागरिक ही संकल्पना फार व्यापक आहे आणि म्हणूनच प्रत्यक्षात आणण्यास कठीण आहे; मात्र तरीही देशातील सर्व नागरिकांनी आदर्शतेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न सातत्याने करायला हवा. आदर्श नागरिक हा स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचे पालन करणारा असावा. त्याने प्रामाणिकपणाचा मार्ग चोखाळावा. असत्याचा मार्ग निवडून इतरांची फसवणूक करू नये. दु:खित, पीडितांना त्याने आधार द्यावा. स्वत:च्या बळाचा, सामर्थ्याचा गैरवापर करून त्याने गरिबांना, वंचितांना लुबाडू नये. दुर्गुण सर्वांमध्येच असतात; पण जो मनुष्य ते लपवून न ठेवता ते दूर करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतो, तो आदर्श नागरिक असतो.